**महाराष्ट्र शासन**

**इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी), महाराष्ट्र राज्य,**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर -440022**

**Website:** www.vanarti.in **CIN: U84120MH2026NPL466492** **ईमेल-**:vanarti.info@gmail.com

जा.क्र.वनार्टी/नागपूर/आस्था/437/2026-2027 दिनांक :- 08/06/2026

## शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी (TAIT)- 2026-27 परीक्षा पूर्व ऑफलाईन प्रशिक्षणाकरीता योजनेचा तपशील

महाराष्ट्र राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमाती या प्रवर्गातील नॉन-क्रिमिलेअर गटातील विद्यार्थ्यांना वनार्टी मार्फत शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी (TAIT) या परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी मोफत **ऑफलाईन व अनिवासी पद्धतीने प्रशिक्षण** देण्यात येणार आहे. त्याकरीता इच्छूक विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहे.

- **प्रशिक्षणाचा कालावधी - 4 महिने**
- **विद्यावेतन - 10,000/- प्रतिमाह (75% उपस्थिती असल्यास)**
- **आकस्मिक निधी 12,000/- (एकवेळ)**

➢ **योजनेच्या लाभासाठी पात्रता :**

1. विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा/असावी.
2. अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत विद्यार्थ्यांचे वय 40 वर्षे पेक्षा जास्त असू नये.
3. विद्यार्थी हा नॉन-क्रिमिलेअर गटातील विमुक्त जाती/भटक्या जमाती या प्रवर्ग यापैकी असावा असावी.
4. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण 2018/प्र.क्र.397/टीनटी-1, दि.07 फेब्रुवारी 2019, शासन शुद्धीपत्रक 25 फेब्रुवारी 2019, 16 मे 2019, 12 जुन 2019 तसेच शासनाचे वेळोवेळीच्या आदेशानुसार अर्हताप्राप्त उमेदवार सदर परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनेकरीता पात्र राहील.
5. TET/CTET Paper-I/II/B.Ed मध्ये प्राप्त झालेल्या गुणांकाच्या आधारे मेरीटद्वारे खालील निकषांनुसार अंतिम निवड करण्यात येईल.
6. वर्गवारीनुसार जागा वाटप व शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे:-
7. निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांची पडताळणी प्रशिक्षण संस्थेमार्फत करुन विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल.

➢ **प्रशिक्षणाचे स्वरुप :**

1. विद्यार्थ्यांना परीक्षांचे सुधारित अभ्यासक्रमानुसार शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी (TAIT) परीक्षा पूर्व प्रशिक्षण ऑफलाईन स्वरुपात देण्यात येईल.
2. सदर प्रशिक्षणाचा कालावधी हा 04 महिन्यांचा असेल.

➢ **आरक्षण :**

**सामाजिक प्रवर्ग व समांतर आरक्षण पुढीलप्रमाणे :**

| **अ.क्र.** | **सामाजिक प्रवर्ग** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| 1 | विमुक्त जाती (VJ-A) | 40% |
| 2 | भटक्या जमाती - ब (NT-B) | 22.50 % |
| 3 | भटक्या जमाती क (NT-C) | 22.50 % |
| 4 | भटक्या जमाती ड (NT-D) | 15 % |
| | एकूण | 100% |

- **संमातर आरक्षण पुढीलप्रमाणे :**

1. प्रवर्गनिहाय महिलांसाठी 30% जागा आरक्षित आहे.
2. दिव्यांगाकरिता 5% जागा आरक्षित आहे.
3. अनाथांसाठी 1% जागा आरक्षित आहे.

➢ **अर्ज करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे:**

1. आधार कार्ड
2. जातीचे प्रमाणपत्र (Cast Certificate)
3. वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate)
4. पदवीचे प्रमाणपत्र/गुणपत्रिका
5. B.Ed/D.Ed/B.El.Ed/BA.Ed/B.Sc.Ed उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र / गुणपत्रिका
6. TET व CTET उत्तीर्ण झाल्याचा निकाल / गुणपत्रिका
7. दिव्यांगाचे प्रमाणपत्र (दिव्यांग असल्यास)
8. अनाथ असल्यास दाखला

➢ **अर्ज कसा करावा**

1. वनार्टीच्या www.vanarti.in या संकेतस्थळावर जाऊन Notice Board मधील "Application for Application for Teachers Aptitude and Intelligence Test (TAIT)-2026-27 Training" यावर जाऊन ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावा.
2. अर्जासोबत तपशीलात नमुद सर्व कागदपत्रे स्वाक्षांकीत करून स्पष्ट दिसतील असे स्कॅन करुन जोडावे.
3. उमेदवाराने अर्जामधील दिलेली सर्व माहिती पूर्ण भरायची आहे त्याशिवाय योजनेकरीता नोंदणी अर्ज वैध मानले जाणार नाही.

➢ **अटी व शर्ती :-**

1. अर्ज करण्याचा अंतिम दि. 25/06/2026 आहे.
2. पोस्टाने किंवा ई-मेल व्दारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.

3. विद्यार्थ्यांनी पुरविलेली कोणतीही माहिती चुकीची आढळुन आल्यास सदर योजनेच्या लाभाकरीता विद्यार्थ्याचे अर्ज ग्राह्य धरल्या जाणार नाही.
4. जाहिरात रद्द करणे, मुदतवाढ देणे, अर्ज नाकारणे व स्विकारणे याबाबतचे सर्व अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक, वनार्टी यांचे राहतील.
5. कोणत्याही माध्यमातुन व अंतीम निवड प्रक्रियेच्या दरम्यान किंवा प्रशिक्षणाच्या कोणत्याही टप्यावर उमेदवारांनी सादर केलेली माहिती चुकीची, दोषपूर्ण व दिशाभूल करणारी असल्यास अथवा उमेदवाराने यापूर्वी वनार्टी मार्फत राबविण्यात येणाऱ्या कोणत्याही योजनेचा लाभ घेतल्याचे आढळल्यास तसेच महाराष्ट्र राज्य शासनाच्या 'सारथी 'या संस्थे मार्फत योजनेचा लाभ घेतला असल्यास त्यांची निवड रद्द करण्यात येईल.
6. अर्ज भरतांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी आल्यास कार्यालयीन वेळेत (सकाळी 10.15 ते सांय. 6.15 वाजता पर्यंत) वनार्टीच्या Call Centre वर संपर्क करावा.

- **संपर्क क्रमांक :-** 7887882026
- **E-mail Id :-** vanarti.info@gmail.com या ईमेलवर संपर्क साधावा
- **संस्थेचे संकेतस्थळ (Website)** :- www.vanarti.in

**स्वा-**
(प्रशांत वावगे)
**व्यवस्थापकीय संचालक (प्र.)**
वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था
(वनार्टी)